क्रमांक : १६८२७ / ब
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : ११ ऑगस्ट, २०२२

**:: प रि प त्र क ::**

**विषय :** **महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२२ च्या तृतीय अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराकरिता नेमून देण्यात आलेल्या दिनांकांबाबतचे विवरणपत्र .....**
**संदर्भ :** **या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक १२७१६/ब, दिनांक १७ जून, २०२२**

विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या गुरुवार, दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार सोमवार, दिनांक १८ जुलै, २०२२ रोजीपासून सुरु होणारे आगामी तृतीय (पावसाळी), अधिवेशन आता बुधवार, दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजी पासून विधानभवन, मुंबई येथे सुरु होणार आहे. त्यानुसार बुधवार दिनांक १७ ऑगस्ट ते गुरुवार, दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीतील तारांकित प्रश्नोत्तरांबाबतची माहिती दर्शविणारे सुधारीत विवरणपत्र (सोबत जोडल्या प्रमाणे ) आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

**विवरणपत्रात स्तंभ क्रमांक ६ मध्ये प्रश्नांच्या ऑनलाईन हस्तांतरणाचा शेवटचा दिनांक दर्शविण्यात आलेला आहे. उक्त दिनांकानंतर प्रश्न हस्तांतरणाची प्रकरणे या सचिवालयास प्राप्त झाल्यास तारांकित स्वीकृत प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक/गट बदलून देता येणे शक्य होणार नाही. अशा स्थितीत त्या प्रश्नाच्या उत्तरासाठी नेमून दिलेल्या दिनांकास उत्तर प्राप्त होणे आवश्यक राहील, तसेच संबंधित मा.मंत्री महोदयांना सदर तारांकित स्वीकृत प्रश्नाच्या उत्तराकरिता निश्चित केलेल्या मूळ दिवशीच सभागृहात उपस्थित राहून अनुपूरक प्रश्नांना उत्तरे द्यावी लागतील.**

**उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता तारांकित प्रश्न अन्य विभागाकडे हस्तांतरीत होत असल्यास, विवरणपत्रात दर्शविण्यात आलेल्या प्रश्नाच्या ऑनलाईन हस्तांतरणाच्या शेवटच्या दिनांकापर्यंत सदर प्रश्नाच्या ऑनलाईन हस्तांतरणाची QIS या संगणक प्रणालीद्वारे कार्यवाही पूर्ण करावी व हस्तांतरणाबाबत विधानसभा प्रश्न कक्षाच्या b1.qust.mls@gmail.com या ई-मेलवर तातडीने पत्राद्वारे या सचिवालयास अवगत करण्याबाबत सर्व मंत्रालयीन विभागांनी दक्षता घ्यावी.**

**( मेघना तळेकर)**
उप सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

(१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
(२) मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
(३) मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
(४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित.



E:\RESHMA\ROTATION DECEMBER 2022\A4 Rota press 2 2018.doc

# महाराष्ट्र विधानसभा

## तृतीय (पावसाळी) अधिवेशन, २०२२

### तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक, विभागाकडून उत्तर येण्याचा अंतिम दिनांक तसेच प्रश्नांच्या ऑनलाईन हस्तांतरणाचा शेवटचा दिनांक इत्यादी माहिती दर्शविणारे सुधारित विवरणपत्र

| गट क्र. | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री | उत्तराचा पुर्वीचा वार व दिनांक | उत्तराचा सुधारित वार व दिनांक | विभागाकडून उत्तर येण्याचा सुधारित वार व दिनांक | प्रश्नाच्या ऑनलाईन हस्तांतरणाचा शेवटचा वार व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| एक | (१) अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री<br>(२) अन्न व औषध प्रशासन मंत्री<br>(३) शालेय शिक्षण मंत्री<br>(४) उच्च व तंत्रशिक्षण मंत्री<br>(५) पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री<br>(६) परिवहन, संसदीय कार्य मंत्री<br>(७) पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल राजशिष्टाचार मंत्री | * सोमवार, दिनांक १८ जुलै, २०२२ | *सोमवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ | मंगळवार, दिनांक १६ ऑगस्ट, २०२२ | मंगळवार, दिनांक १६ ऑगस्ट, २०२२ |
| दोन | (१) मुख्यमंत्री<br>(२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(३) गृहनिर्माण मंत्री, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री<br>(४) नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री | *मंगळवार, दिनांक १९ जुलै, २०२२ | *मंगळवार, दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ | बुधवार, दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ | मंगळवार, दिनांक १६ ऑगस्ट, २०२२ |
| तीन | (१) उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री<br>(२) उर्जा मंत्री<br>(३) इतर मागास बहुजन कल्याण,खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री<br>(४) आदिवासी विकास मंत्री<br>(५) सहकार, पणन मंत्री<br>(६) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री | बुधवार, दिनांक २० जुलै, २०२२ | बुधवार, दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ | शुक्रवार, दिनांक १२ ऑगस्ट, २०२२ | शुक्रवार, दिनांक १२ ऑगस्ट, २०२२ |
| | | बुधवार, दिनांक २७ जुलै, २०२२ | बुधवार, दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ | गुरुवार, दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ | मंगळवार, दिनांक १६ ऑगस्ट, २०२२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| चार | (१) उप मुख्यमंत्री<br>(२) जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री<br>(३) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री<br>उद्योजकता मंत्री<br>(४) ग्रामविकास व कामगार मंत्री<br>(५) वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री<br>(६) महिला व बालविकास मंत्री<br>(७) मृद व जलसंधारण मंत्री | ○<br>गुरुवार, दिनांक २१ जुलै, २०२२ | गुरुवार, दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ | शुक्रवार, दिनांक १२ ऑगस्ट, २०२२ | शुक्रवार, दिनांक १२ ऑगस्ट, २०२२ |
| | | गुरुवार, दिनांक २८ जुलै, २०२२ | गुरुवार, दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ | गुरुवार, दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ | मंगळवार, दिनांक १६ ऑगस्ट, २०२२ |

(टिप : गट-१ चे * सोमवार, दिनांक १८ जुलै, २०२२ व * सोमवार, दिनांक २५ जुलै, २०२२ या दोन्ही आठवड्याचे प्रश्न एकत्रित करण्यात येऊन सदर प्रश्न दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी घेण्याचा तसेच गट-२ चे * मंगळवार, दिनांक १९ जुलै, २०२२ व * मंगळवार, दिनांक २६ जुलै, २०२२ या दोन्ही आठवड्याचे प्रश्न एकत्रित करण्यात येऊन सदर प्रश्न दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ रोजी घेण्याचा निर्णय मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी घेतला आहे.)